**नि.फौ.के. नं. १३२/२०१९**

**नि. क्र. १५०/क**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब**

नाव – अरविंद भारत गटकुळ

वय– ४० वर्षे, व्यवसाय – सहा.पोलीस निरीक्षक,

नेमणुक – जुन्नर पोलीस स्टेशन पुणे.

**सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीमती. एस. ए. गायकवाड यांचेतर्फे –**

०१. दि.१०.०४.२०१९ रोजी मी पोलीस ठाणे गेवराई येथे पोलीस उपनिरीक्षक पदी कार्यरत होतो. त्या दिवशी अमोल रामचंद्र पाटील यांनी फिर्याद दाखल केली होती. सदर फिर्यादीअन्वये सहा.पो.फौ. एस.जी. सुक्रे यांनी गुन्हा दाखल केला होता. त्याचे तपासकाम माझेकडे सुपूर्द झाले होते. तपासकामात मी सर्वप्रथम घटनास्थळी पाडळसिंगी टोलनाका येथे घटनास्थळ पंचनामा ज्यामध्ये इमारतीचा पंचनामा आणि टोलबुथचा पंचनामा केला होता. सदरचा इमारतीचा पंचनामा मी दुपारी ३.३० पर्यत केला. तर टोलबुथचा पंचनामा सायंकाळी ४.०० वा. पार पडला.

०२. मी या तपासकामात संबंधित साक्षीदारांची तपासटिपणे नोंदवली होती. आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला मात्र आरोपी आम्हाला मिळून आले नाहीत. घटनास्थळ पंचनामा करताना तोडफोड झाल्यामुळे जेही नुकसान झाले होते त्याच्या सर्व नोंदी पंचनाम्यात केल्या होत्या. त्या ठिकाणी मिळून आलेला किंमती मुददेमाल उपस्थित साक्षीदारांकडे परत देण्यात आला होता तो जप्त केला गेला नव्हता. साक्षीदाराला आता सदरच्या घटनास्थळ पंचनामा क्र.१ ची प्रत दाखवली. हा तोच पंचनामा आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा आणि बरोबर आहे. सदर पंचनाम्याला नि.पी–२ देण्यात आलेले आहे. दुसरा पंचनामा त्याच दिवशी ४ ते ५.३० चे दरम्यान पार पडला होता. त्या ठिकाणी आम्ही बुथवर झालेली तोडफोड आणि पुराव्याच्या नोंदी घेतल्या होत्या. मला

दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर खरा आणि बरोबर आहे. सदरचा पंचनामा नि.पी–३ येथे आहे.

०३. मी साक्षीदारांच्या कथनानुसार त्यांची टिपणे नोंदवली होती. त्यानंतर आरोपींचा शोध घेण्यात आला. दि.११.०४.२०१९ रोजी त्यांना अटक करण्यात आली. एकूण चार आरोपी त्यावेळेस मिळून आले. तत्पूर्वी त्यांची वैद्यकीय तपासणी आणि अटक पंचनामा केला होता. मला आता दाखवण्यात आलेले अटक पंचनामे तेच आहेत. सदरच्या पंचनाम्यावर माझी सही आहे. सदरच्या अटक पंचनाम्यांना अनुक्रमे **नि.१५१ ते १५४** देण्यात येते. दि.१३.०४.२०१९ रोजी आणखी चार आरोपींना अटक करण्यात आली. त्यांचाही अटक पंचनामा पार पडला होता. मला दाखवण्यात आलेले एकूण पाच अटक पंचनामे तेच आहेत. त्यावर माझी सही आहे. सदरच्या अटक पंचनाम्यांना अनुक्रमे **नि.१५५ ते १५९** देण्यात येते.

०४. दि.१५.०४.२०१९ रोजी इतर आरोपींना अटक करण्यात आली. त्यांचाही अटक पंचनामा पार पडला होता. मला दाखवण्यात आलेले एकूण सात अटक पंचनामे तेच आहेत. त्यावर माझी सही आहे. सदरच्या अटक पंचनाम्यांना अनुक्रमे **नि.१६० ते १६६** देण्यात येते. दि.२३.०४.२०१९ रोजी आणखी दोन आरोपींना अटक करण्यात आली. त्यांचाही अटक पंचनामा पार पडला होता. मला दाखवण्यात आलेले एकूण दोन अटक पंचनामे तेच आहेत. त्यावर माझी सही आहे. सदरच्या अटक पंचनाम्यांना अनुक्रमे **नि.१६७ व १६८** देण्यात येते.

०५. दि.२४.०४.२०२०१९ रोजी याकामी आणखीन साक्षीदारांची तपासटिपणे नोंदवण्यात आली होती. तपासकामात मी मा. अप्पर जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडून दि.०३.०४.२०१९ ते १७.०४.२०१९ पर्यतचा प्रतिबंधात्मक आदेश प्राप्त करुन तो तपासकामात दाखल केला होता. सदरचा जमावबंदी आदेश होता त्या अन्वये पाचपेक्षा जास्त लोकांनी कोणत्याही कारणास्तव जमाव करणेवर बंदी होती. संपुर्ण तपासाअंती दि.०९.०४.२०१९ रोजी आरोपी क्र.१ ते १८ यांनी मा. जिल्हा दंडाधिकारी

बीड यांचा जमावबंदीचा आदेश पारीत असताना मौजे पाडळसिंगी शिवारातील आयआरबी टोलनाका येथे एकत्र जमाव करुन त्या जमावाचा भाग बनून तो जमाव गैरकायदा आहे या तथयाची जाणीव असताना टोलनाका इमारत तसेच टोलबुथमध्ये घुसून अतिक्रमण केले तसेच इमारतीवर हातात दगड घेवून दगडफेक केली, इमारतीचे नुकसान केले, टोलनाक्याच्या इमारतीमध्ये घुसून मौल्यवान वस्तूंची आदळआपट करुन तोडफोड केली तसेच टोलबुथच्या जाळयांची जाणीवपूर्वक मोडतोड केली या गुन्हयाखाली मी सर्व आरोपीं विरुध्द भा.द.वि. कायदा कलम १४३, १४७, १४९, ३३६, ४५२, ४२७ सह कलम ३, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपण कायदा सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा या कायदयाअंतर्गत दोषारोपपत्र दाखल केले. मी सर्व आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. ते आजरोजी न्यायालयात उपस्थित नाहीत.

<u>सरतपास पुर्ण</u>.

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एस.पी. येवले यांचेतर्फे</u> –

०६. आम्ही तपासकामामध्ये पुन्हा फिर्यादीकडे चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी जबाबामध्ये कोणत्याही आरोपीचे नाव स्पष्ट नमूद नाही. तपासकामात आम्ही आयआरबी यांच्याकडून झालेल्या नुकसानासंदर्भात कोणतेही कागदोपत्री पुरावे हस्तगत केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही कोणतेही नुकसान झालेले साहित्य पंचनाम्यामध्ये पुराव्याकामी जप्त केलेले नव्हते. आम्ही तपासकामा मध्ये दगडफेकीसाठी वापरण्यात आलेले दगड पंचनाम्यावेळी जप्त केले नव्हते. हे मला माहित नाही की, आयआरबी ही खाजगी संस्था आहे. आरोपींना अटक केल्यानंतर फिर्यादी समक्ष त्यांची ओळखपरेड घेण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आयआरबीच्या सांगण्यानुसार पंचनाम्याचे पंच उपस्थित नसताना खोटे पंचनामे बनवण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांची तपासटिपणे त्यांच्या सांगण्यानुसार नोंद केली नव्हती. तपासकामात कोणतेही सिसिटीव्ही फुटेज हस्तगत करण्यात आले नव्हते.

०७. हे म्हणणे खरे नाही की, तपासकामात आरोपी क्र.१ ते १८ विरुध्द कोणताही गुन्हा केल्याचे निष्पन्न न होताच त्यांचे विरुध्द हे खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.09.16 10:39:32 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक १५/०९/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ गेवराई.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 15.09.2025 |
| Transcribed on | :- | 15.09.2025 |
| Checked & Signed on | :- | 15.09.2025 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer (G-3)